# मराठी साहित्याची *बुकगंगा* जगभरात पोहोचवणारा भगिरथ

## मूळ साखरप्यातील असणाऱ्या मंदार जोगळेकर यांचे अमेरिकेतून प्रयत्न




▸ कैलास गांधी *(दापोली)*

तंत्राशी फटकून राहून कोणतीही कला फारकाळ टिकून राहू शकत नाही. साहित्य ही कला तर मुळी गुटेनबर्ग छपाई तंत्राच्या प्रगती सोबत वृद्धींगत होत गेली. या एका मोठ्या कालखंडानंतर अवघे 'पुस्तक विश्व' एका स्थित्यंतरातून जात आहे. हे स्थित्यंतर ओळखून डिजीटल तंत्रज्ञानाच्या आधार घेत ई -बुकच्या माध्यमातून मराठी साहित्य प्रसाराचे काम 'बुकगंगा डॉट कॉम'च्या माध्यमातून मूळचे रत्नागिरीकर मंदार जोगळेकर करत आहेत.

BookGanga

**जागतिक पुस्तक दिन विशेष**

ते रत्नागिरी जिल्ह्यातील साखरप्याचे. सध्या त्यांच्या 'बुकगंगा'कडे ६०,००० हून अधिक पुस्तकांचा खजिना आहे. यामध्ये मराठीतील प्रथितयश लेखकांच्या १२५ हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे. श्री. जोगळेकर यांचे बुकगंगाच्या माध्यमातून सुरू असणारे कार्य प्रचंड आहे. एवढे करून ते स्वस्थ बसलेले नाहीत. ग्लोबल मराठी ही त्यांची वेबसाईटही आहे. शिवाय 'माय विश्व' नावाने ते सोशल नेटवर्किंग साईटही चालवतात, हेही तेवढेच विशेष!

'बुकगंगा' म्हणजे पुस्तकांचा आणि त्यातील ज्ञानाचा शब्दशः धबधबा आहे म्हणा ना! त्यामध्ये ग्रंथाली, अमेय प्रकाशन, अक्षर, भारतीय विचार साधना, डायमंड, लोकवाङ्मय ग्रह, गायत्री, गौतमी, इकॉलॉजिकल सोसायटी, मैत्रेय मंजुल, मौज, मराठी साहित्य परिषद, पॉप्युलर यासारख्या प्रकाशन संस्थांच्या पुस्कारांचा समावेश आहे. या पुस्तकांमध्ये मराठीबरोबरच आसामी, बंगाली, इंग्रजी, जर्मन, गुजराती, हिंदी, कन्नड, कोकणी, मल्याळम्, ओरिया, राजस्थानी, संस्कृत, तमीळ, तेलगू, ऊर्दु पुस्तकांचा समावेश आहे.

मंदार मोरेश्वर जोगळेकर सध्या फिलाडेल्फिया म्हणजेच अमेरिकेत वास्तयास आहेत.



जोगळेकर मराठी माध्यमातून शिकलेले व सर्व सामान्य कुटुंबातीलच **पान ४ वर** ▸

## मराठी साहित्याची बुकगंगा जगभरात पोहोचवणारा भगिरथ

आहेत. मात्र, कल्पनेच्या जोरावर ते आज आज यशस्वी मराठी उद्योजक ठरलेत. तंत्रज्ञानाच्या अफाट जगात 'कल्पनाशक्ती'ची जादू काय असेल, तर ती म्हणजे श्री. जोगळेकर यांचे पुस्तकांच्या पसाऱ्यातले भन्नाट कष्ट आणि त्यांना मिळालेले यश. तेही कागदाचा फारसा संबंध न येता... एका क्लिकच्या जोरावर!

जोगळेकर यांच्यामते गतीमान कार्यपद्धतीचा वापर करून तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल आत्मसात केले तर नजीकच्या काळात छोट्या गावातील लेखक आपले साहित्य 'ई-बुक'च्या माध्यमातून वाचकांना उपलब्ध करून देऊ शकतील. अमेरिकेसारख्या आधुनिक राष्ट्रांच्या विकासात साहित्याचा सर्वसामान्य लोकांपर्यंत झालेला प्रसार हा महत्त्वाचा घटक आहे. काही वर्षांत लेखकाचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या माध्यमात अमूलाग्र बदल झालेले आहेत. तेथे पुस्तके विक्री करणाऱ्या वेबसाईटवरून इंग्रजी भाषेचे कोणतेही पुस्तक घरपोच उपलब्ध होते.

पारंपरिक दुकानांच्या माध्यमातून पुस्तके वितरण करण्यासाठी लागणारे भांडवल, मनुष्यबळ, यामध्ये दिवसेंदिवस खर्चाचा ताळमेळ घालणे कठीण होत आहे. यामुळे पुस्तकांची अनेक दुकाने बंद पडत चालली आहेत. कॉम्प्युटर आणि विविध प्रकारच्या 'टॅबलेटस्'मुळे वाचकांना ई-बुकची सवय लागत आहे. पुस्तकाची ही इलेक्ट्रॉनिक्स आवृत्ती कमीत कमी किमतीत जगभरातील वाचकांच्या हातात क्षणभरात देणे शक्य होत आहे. ई-बुकस्चा खप गेल्या काही वर्षांत दीडपटीने वाढला आहे, हेही लक्षात घ्यावे लागेल.

पाश्चात्य देशांत विकसित झालेले तंत्रज्ञान भारतात सर्वसाधारण नागरिकांच्या हाती साधारणतः ३-४ वर्षांनी येते. पण, अलिकडे यातही बदल झालाय्. या 'बुकगंगाचा खळखळाट' मोलाची कामगिरी बजावत आहे. भारतीय साहित्य जगभरातील वाचकांपर्यंत जगभर पोहोचवणाच्या उद्देशाने बुकगंगा डॉट कॉमने पुढाकार घेतला. या माध्यमातून भारतीय साहित्यातील अनेक प्रकाशकांची सुमारे ५० हजारच्यावर पुस्तके विक्रीसाठी थोड्याच कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आली. त्याबरोबर हजारो पुस्तके ही ई-बुकस् स्वरुपात उपलब्ध होत आहेत. नवीन पुस्तके प्रकाशित होत असताना ती ई - बुकस्च्या माध्यमातून क्षणार्धात उपलब्ध करुन दिली जात आहेत.

ई-बुक तयार करण्यासाठी लेखक, प्रकाशकांनी आपले साहित्य छापील वा 'पीडीएफ्' स्वरुपात बुकगंगाकडे पाठवल्यानंतर 'बुकगंगा रिडर'च्या माध्यमातून ती ई-बुक स्वरुपात वाचकांना उपलब्ध करुन दिली जातात. पायरसी थांबवण्यासाठी विशेष काळजी घेतली जाते. ई-बुक साहित्य प्रकाशित आणि वितरीत करताना छपाईचा खर्च येत नसल्याने ई-बुकची किंमत कमी ठेवणे शक्य होते. लेखक, प्रकाशकांना त्यांचे पुस्तक विक्री होताक्षणी समजू शकते आणि व्यवहारात पारदर्शकता राखता येते, जे पूर्वी सहजी शक्य नव्हते. लेखकांना ६० टक्के रॉयल्टी देणेसुद्धा आता शक्य झाले आहे. पुस्तक वाचण्याबरोबर त्या पुस्तकाच्या संदर्भातील दृकश्राव्य माध्यमातून त्या साहित्याचा आस्वाद घेणे, आता सहज शक्य होणार आहे. एखादी कविता स्वतः कवी आपल्या आवाजातून पेश करू शकेल आणि ती रसिकांपर्यंत पोहोचवू शकेल. यामुळे हजारो पुस्तके आता सहजपणे आपल्या हातात सामावणार आहेत. भारतीय साहित्य ई-बुक स्वरूपात जतन करण्याचे काम विविध पातळ्यांवर सुरु आहेच. पण त्याला योग्य दिशा देऊन एकाच ठिकाणी ते सर्व उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ग्रंथालयातील जुने ग्रंथ आता ई-बुक स्वरुपात रुपांतरीत करणे अत्यावश्यक आहे. यासाठी विविध उद्योगसमूहाचे आर्थिक पाठबळ मिळू शकते.

छोट्या गावातील शाळांमधून कॉम्प्युटर आणि इंटरनेटचा वापर वाढतो आहे. शाळा महाविद्यालयामधून अभ्यासक्रमाची व संदर्भग्रंथाची माहिती ई-लायब्ररी बुकगंगा डॉट कॉमच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. याच तंत्रामुळे जगभरातील विविध संदर्भग्रंथांचा खजिना आता एका क्लिकवर महाराष्ट्रातल्या अतिदुर्गम अशा चंद्रपूर जिल्ह्यातील छोट्या गावातही उपलब्ध असेल. संगीत क्षेत्रात पायरसीमुळे कलाकारांना योग्य तो मोबदला मिळत नाही. हे लक्षात घेता, ई-बुकच्या युगात पायरसी झालेली पुस्तके रस्त्यावर विक्रीसाठी उपलब्ध होऊ नयेत, म्हणून लेखक, प्रकाशकांनी आपले साहित्य वेळीच वाचकांच्या हातात ई-बुक स्वरुपात योग्य किमतीमध्ये उपलब्ध करून देणे, अत्यावश्यक आहे. वेळीच यावर कृती केली नाही तर पुस्तकांच्या क्षेत्रातील पायरसी रोखणेही कठीण होईल. त्याचवेळी ई-बुक विकत घेऊन वाचायची मानसिकता विकसित करणेही खूप महत्त्वाचे आहे.

गेल्या वेळी ठाणे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात बुकगंगाचा एकच स्टॉल असा होता की, जेथे पुस्तकेच नव्हती; मात्र तो 'बुकस्टॉल' होता. तेथे ई-बुकस् पाहण्यासाठी वाचकांनी तोबा गर्दी केली होती. हे लक्षात घेता, येत्या काही वर्षात विविध साहित्य संमेलनामध्ये ई-बुकस्चे स्टॉलसुद्धा मोठ्या प्रमाणात लागलेले दिसतील. आजच्या तरूण पिढीचे संपर्काचे साधन इंटरनेट आहे. अर्थात त्यांच्यात वाचनसंस्कृती वाढवायची असेल तर त्यांच्या माध्यमातूनच त्यांच्यापर्यंत साहित्य पोहोचवणे गरजेचे आहे.

ई-पुस्तकांचा दिवसेंदिवस वाढणारा खप हा वाचनसंस्कृती वाढत असल्याचाच निदर्शक आहे. आज फोनवर ऑर्डर करुन पुस्तके घरपोच मिळतात किंवा आपल्या कॉम्प्युटरवर डाऊनलोड करता येतात. याचमुळे पुण्या-मुंबईसारख्या शहरांच्या बाहेर छोट्या गावांतूनही साहित्य उपलब्ध होत आहे. हॅरी पॉटरसारख्या पुस्तकांच्या जगभर अनेक आवृत्त्या निघत असतानाच मराठी साहित्यकृती त्याच धर्तीवर विविध भाषांमध्ये उपलब्ध होण्याचे दिवस आता फार दूर नाहीत. श्री. जोगळेकर यांच्यासारख्या 'भगिरथां'ची मेहनत लवकरात लवकर फळाला यावी, हीच जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने अपेक्षा!